बन्सीलाल रामनाथ अग्रवाल चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे संचालित

# विश्वकर्मा विद्यालय मराठी प्राथमिक

AN ISO 21001 : 2018 CERTIFIED SCHOOL

६६६, अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे – ४११०३७.

जावक क्र. : विविमप्राशा / 2024-25 / 907                                   दिनांक : 14-10-2024

<u>शाळेच्या नावात बदलबाबत हमीपत्र</u>

बन्सिलाल रामनाथ अग्रवाल चॅरिटेबल ट्रस्ट अंतर्गत चालू असलेली गुरुकुल विद्यालय हे नाव मान्यतेच्या वर्षी 1989 होते . त्यानंतर 1994 रोजी संस्थेने शिक्षण मंडळ कार्यालयाकडे नाव बदलासाठी अर्ज केल्याने संदर्भ क्र. प्रा /प्राशि /जा.तु /पी.आर/93 दि. 27-1-1994 च्या आदेशान्वये शाळेचे नाव विश्वकर्मा विद्यालय मराठी असे बदल करून मिळाले .

सबब स्वमान्यतेसाठी हमी पत्र लिहून देत आहे .

Director
B. R. Agarwal Charitable Trust's
Vishwakarma Vidyalaya
Pune - 411 037.

मुख्याध्यापिका
विश्वकर्मा विद्यालय मराठी पाथमिक
६६६, अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी,
पुणे – ४११ ०३७.

महाराष्ट्र शासन

क्रमांक:-व्हीएलएस-१०८९/सीआर ४५७८
प्राशि-3
शिक्षण व सेवायोजन विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- ३०. १९८९
१९ ऑगस्ट, १९८९

प्रति, सचिव,
बन्सीलाल अग्रवाल चॅरिटेबल ट्रस्ट,
अप्पर बिबवेवाडी, इंदिरानगर, पुणे-४११०३७
जिल्हा पुणे.

विषय :- गुरुकुल
प्राथमिक शाळेस परवानगी मिळण्याबाबत.......

महोदय,

वरील विषयासंबंधी लिहीलेल्या पत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या संस्थेस पुणे शहर, जिल्हा पुणे या ठिकाणी जून १९८९ पासून इयत्ता १ली ते ४थी च्या वर्गासहीत मराठी माध्यमाची खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास पूर्णपणे विना अनुदान तत्वावर परवानगी देण्याबाबतचे योग्य ते आदेश विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांना देण्यांत आले आहेत. पुढील कार्यवाहीसाठी आपण कृपया त्यांच्याशी परस्पर संपर्क साधावा.

आपला विश्वासू,

(व. ल. फातरपेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

एसएसएस,
१६.६.

त्वरीत.

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे १ यांचे कार्यालय
दिनांक- 16 OCT 1989

(3)

प्रति,

शिक्षणाधिकारी
[प्राथमिक विभाग]
जिल्हा परिषद, ...पुणे......

सन १९८९-९० या शै. वर्षात

विषय - ~~जून १९८७ पूर्वी जुन्या पध्दतीनुसार सुरु असलेल्या अनधिकृत~~ खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत......

संदर्भ - शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. खाशाप्र. १०८९/३६६५/[प्राशि ३]... दिनांक ५.१०.८९ चे पत्र.

उपरोक्त विषयासंबधीचे आपले कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकन करावे.

याबाबत कळविण्यात येते की, खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घातलेल्या सर्व साधारण बंदीस अपवाद करुन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविल्या ठिकाणी व व माध्यमातून जून १९८९ पासून इ. १ली ते सन ~~८७-८८~~ ८९-९० या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह प्राथमिक शाळा सुरु करण्यास खालील नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विना अनुदान तत्वावर "खास बाब" म्हणून परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम. |
|---|---|---|---|
| बन्सीलाल रामनाथ अग्रवाल चॅरिटेबल ट्रस्ट | इंदिरानगर बिबवेवाडी. | — | मराठी |

१] संस्था सदर शाळा विना अनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिक दृष्ट्या सक्षम असली पाहिजे.

२] संस्थेने शाळेसाठी शासनाने विहीत केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथ. शिक्षण नियमावली १९४९ मध्ये विहीत केलेल्या अटींनुसार जागा, शैक्षणिक साहित्य आणि इतर सुविधांची सोय केली पाहिजे. तसेच शाळेसाठी विहीत केलेल्या नियमानुसार विहीत वयोमर्यादेत व प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमला पाहिजे व त्यांना शासनाने विहीत केलेल्या दरानेच वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

.... २ ....

३] संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे [उदा. वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या, विद्यार्थ्यांचे प्रवेश इ. ] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

४] संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणातेही दुष्परिणाम होणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे.

५] ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खालील नमूद केलेल्या बाबींची खात्री करुन घेवून मगच त्या संस्थेला खाजगी शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

[१] संबधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त, अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० या दोन्ही अधिनियमांखाली नोंदली आहे.

[२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

[३] सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळांपैकी अेखादया शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

[४] संबधित संस्थेत कोणताही प्रकारचा गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत अेखादे प्रकरण प्रलंबीत नाही.

६] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

७] संस्थेने विहीत नमुन्यात मागणी अर्ज केला आहे. [यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करुन घ्यावा. ]

८] शासनाची मंजुरी नसताना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा.

स्थळप्रतीवर शि.उ. सं पु. वि यांची सही आहे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १ करिता.

प्रत- प्रशासनाधिकारी /महानगरपालिका/~~नगरपालिका~~ शिक्षण मंडळ
..पुणे..... जिल्हा ....पुणे. यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत- मा. ~~अध्यक्ष~~ सचिव बन्सीलाल..रामनाथ..अग्रवाल..चॅरिटेबल..ट्रस्ट
..इंदिरानगर...बिबवेवाडी...पुणे...........................

यांना माहितीसाठी अग्रेषित.

27

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका
जा.क्र.मनपा/शिक्षण/खाप्राशा/ 843
दिनांक - २३।७।९१.
२-८-९१

(3)

शाळा प्रमुख,

अ.शा. अग्रवाल चॅरिटेबल ट्रस्ट पुणे.
गुरुकुल विद्यालय, अप्पर इंदिरानगर पुणे ३७. यांस -

विषय - शाळा मान्यतेबाबत.

संदर्भ - मा.शि.मं.ठ.क्र. २२५ दिनांक - १०।१।९१

मा. शिक्षण मंडळ ठराव क्रमांक - २२५ दिनांक - १०।१।९१ व

शिक्षण मंडळाने केलेल्या पाहणीवरुन तुमचे शाळेस फक्त सन १९९१-१९९२ या शाळेस वर्षाकरिता विनाअनुदान तत्वावर पाहणी अहवालातील खालील दर्शविलेल्या त्रुटींची पूर्तता व मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ मधील नियमांची पूर्तता करण्याच्या अटीवर सन १९९१-९२ या शैक्षणिक वर्षात खालील प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह मान्यता देण्यात येत आहे. खालील त्रुटींची पूर्तता विहित मुदतीत न केल्यास शाळेची मान्यता पुढे चालू ठेवणे शक्य होणार नाही, याची नोंद घ्यावी.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| इयत्ता दोन | इयत्ता दोन | इयत्ता दोन | इयत्ता दोन | इयत्ता - | इयत्ता - | इयत्ता |
| १ली तुकड्या | २री तुकड्या | ३री तुकड्या | ४थी तुकड्या | ५ वी - | ६ वी - | ७ वी |

(१) विना अनुदान खाजगी प्राथमिक शाळांना वर्ग फी रु. १५/- (पंधरा) शासनाचे नियमाप्रमाणे फी घेता येईल. तुमचे शाळेत वर्ग फी रु. १५/- पेक्षा जास्त फी घेण्यात येते.

(२) शाळेत नेमण्यात आलेले दोन शिक्षक प्राथमिक शाळांसाठी अप्रशिक्षित (बी.ए.बी.एड.) आहेत.

(३) शाळेत नेमण्यात आलेले चार शिक्षक विहित वयोमर्यादेपेक्षा जादा वयाचे आहेत.

(४) शाळेतील ३ री वर्गातील विद्यार्थी संख्या शहरी भागाचे मानाने कमी आहे. (सन १९९१-९२ मध्ये आवश्यक [illegible] या अटीवर)

(५) शाळेची इमारत शाळेसाठी योग्य नाही.

(६) मागासवर्गीय शिक्षक नेमणे आवश्यक आहे.

(७) शासकीय वेतनश्रेणीप्रमाणे शिक्षकांना वेतन व भत्ते देण्यात येत नाहीत. ते शासकीय वेतनश्रेणीप्रमाणे देण्यात यावेत.

(८) शाळेस क्रीडांगण नाही.

वरील त्रुटींची पूर्तता दिलेल्या मुदतीत (३०।७।९२) न केल्यास पुढील वर्षी शाळेची मान्यता दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे, दिनांक - २३।७।९१

(सही)

(प्र.) शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

26

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका

जावक क्रमांक - मनपा/शिक्षण/प्राशि/ तुकडी/मान्यता - ५५५८

पुणे, दिनांक - ५।३।९२.

विनाअनुदानीत

मुख्याध्यापक/शालाप्रमुख,

बं.रा. अगरवाल ट्रस्टचे गुरुकुल विद्यालय... अप्पर इंदिरानगर.... बिबवेवाडी पुणे ३७. यांस -

2

विषय - मान्य खाजगी अनुदानित / विनाअनुदानित प्राथमिक शालांना नवीन तुकडया/वर्ग उघडण्यास मान्यता देणेबाबत.

संदर्भ - १) आपले दि. २०।५।९१ चे पत्र.

२) मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे जा.क्र. प्रा/प्राशि/जा.तु.पी.आर./९१, दिनांक -

उपरोक्त विषयाबाबत तुमचे संदर्भांकित क्र. १ चे पत्रानुसार तुमचे शाळेस माहे ...जून.......सन ..१९९१...पासून इयत्ता....५ वी....च्या एक तुकडी-स/नैसर्गिक वाढीनुसार वर्गास सुरु करणेस खालील अटींवर मान्यता देण्यात येत आहे.

१) शासकीय नियमानुसार एस.एस.सी., डी.एड. प्रशिक्षित शिक्षक/शिक्षिका नेमावे. ~~नेमण्यासंबंधीचा प्रस्ताव मंजूरीसाठी या कार्यालयाकडे पाठवावा.~~

२) सदर सेवकाचे वय शासन नियमानुसार बिगरमागास - २८ वर्षे व मागासवर्गीयां-करिता ३३ वर्षापर्यंत असावे.

३) सदर तुकडीकरिता शिक्षक नेमताना शासन नियमानुसार मागासवर्गीयांचे प्रमाण पूर्ण करणे आवश्यक आहे.

४) सदर वर्गात नियमाप्रमाणे विद्यार्थी पटसंख्या इ. १ ली ते ४ थी साठी ५० व इ.५ वी ते ७ वी साठी ३० असावी.

५) सदर वर्गाकडून सरासरी हजेरीची अट पूर्ण झाली पाहिजे.

६) जादा तुकडया/वर्गासाठी चालू अंदाजपत्रकात तरतूद नसल्यामुळे पुढील वर्षाचे अंदाजपत्रकीय तरतूद पाहूनच अनुदान देणेबाबत विचार करण्यात येईल.

७) तुकडयांना/वर्गांना जून, १९९१ पासून मान्यता देण्यात आली तरीही आर्थिक तरतुदी-अभावी जून, १९९२ पासून अनुदान देणेचा विचार करण्यात येईल.

कळावे, दिनांक - ५।३।९२

[signature]

शिक्षण प्रमुख

शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

जा. क्र. प्रा/प्राशि/बांप्राशि/आ.पु./
पीआर.
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१. यांचे कार्यालय.
दिनांक :-

15 JUN 1996

प्रति,
१] शिक्षणाधिकारी [प्राथमिक],
जिल्हा परिषद, पुणे विभाग.
२] प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ,
____________
३] शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय,
जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-५.

विषय :- मान्यताप्राप्त अनुदानित/विनाअनुदानित/कायम ~~कायम~~ विना अनुदानीत खाजगी प्राथमिक शाळांना जादा/नैसर्गिक वाढीच्या जादा तुकडया/वर्ग उघडण्यास परवानगी देणे बाबत......

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळांना त्यांचे नावासमोर दर्शविण्यांत आलेल्या नैसर्गिक वाढीच्या प्रथम वर्गात/जादा तुकडीत जून १९९५ पासून अनुदान/~~विनाअनुदान/कायम विनाअनुदान~~ तत्वावर मंजूरी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता तुकडी/नैस. वाढ. | शेरा/मंजूर. |
|---|---|---|---|---|
| १ | विश्वकर्मा विद्यालय बिबवेवाडी | मराठी | इ. ६वी - २री तुकडी | मंजूर |

स्वाक्षरी/-
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १. करिता

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
१] मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
विश्वकर्मा विद्यालय बिबवेवाडी
पुणे - ३७

22

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, शिवाजीनगर, पुणे
जा.क्र. मनपा/शिक्षण/साप्राशा/तु.मा./ 4028
दिनांक - 10/11

शाळा प्रमुख,
अ.रा. अगरवाल चॅरिटेबल ट्रस्टचे
विश्वकर्मा विद्यालय, बिबवेवाडी यांस -
पुणे - 37 (मराठी)

विषय : मान्य खाजगी प्राथमिक शाळांना नविन तुकड्या उघडण्यास मान्यता देणेबाबत

संदर्भ : मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचेकडील पत्र जा.क्र. - प्रा/प्राशि/जा.तु./पी.आर./83 दि. 27/1/94

संदर्भांकित पत्रान्वये कळविल्याप्रमाणे जादा तुकड्यांच्या प्रस्तावाची मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी छाननी केली असता तुमचे शाळेतील खालील दर्शविलेल्या 7 वी इयत्तांच्या ~~जादा तुकडीस~~/नैसर्गिक वाढीच्या वर्गास जून, १९९४-९५ पासून परवानगी देण्यात येत आहे.

| शाळेचे नाव | इयत्ता | जादा तुकडी/ नैसर्गिक वाढ | शेरा |
|---|---|---|---|
| विश्वकर्मा विद्यालय (मराठीमाध्यम) | 7 वी | 1 ला वर्ग नै. वाढ | मंजूर |

(१) वरील जादा तुकड्यांची चालू वर्षाच्या अंदाजपत्रकात तरतूद करण्याची व्यवस्था करावी.

(२) सदर वर्गाकडून सरासरी हजेरीची अट पूर्ण झाली पाहिजे.

(३) जादा वर्गास शिक्षक नेमताना विहित वयोमर्यादेतील व प्रशिक्षित (डी.एड्.) व रोस्टर अंकाप्रमाणे शिक्षक नेमावा.

कळावे, दिनांक - 8/11/94

(sd/-) 10/11
शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.